स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

वास्तव २१ वर्षे

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

सच करीब से ही दिखता है...!

● बीड ● रविवार, दिनांक ३१ मे २०२६ ● वर्ष २१ वे ● पाने : ४ http ://epaper.beedvastav.com Email : beedvatsav@gmail.com ● किंमत ३ रुपये



# वडेट्टीवार म्हणाले, डबल ढोलकी सरकारने हातात घंटा देण्याचे काम केले तर पाटील म्हणाले काँग्रेसनेही ओबीसींचे वाटोळेच केले!!

**काँग्रेसने तेव्हा ओबीसींचे काय कल्याण केले? का झोके बांधून दिले होते? ते काय धडाचे होते का? आणि हे पण काही धडाचे नाहीत : जरांगे**

**काँग्रेस सरकारने ओबीसींचे वाटोळे केले तेच महायुतीच्या सरकारने केले. तेव्हा मराठा, ओबीसींनी दोघांनीही सरकारच्या विरोधात राहिले पाहिजे!**

**मला वाटले होते बदल झाला पाहजे. पण ते परळीचंच म्हणाला होता की, माझी नार्को टेस्ट करा. मी नव्हतं म्हटलं, त्यामुळे तो विषय आता मी पुन्हा हातात घेतो!!**



जालना : प्रतिनिधी

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी मनोज जरांगे यांच्या एकंदरीत आंदोलनावर तसेच सरकारच्या भूमिकेवर सडकून टीका केली. या टिकेला मनोज जरांगे पाटील यांनी देखील सडेतोड प्रतिउत्तर दिले आहे. मनोज जरांगे पाटील म्हणाले, विजय वडेट्टीवार यांचे काँग्रेसचे सरकार असताना ओबीसींचे कल्याण केले होते का? झोके बांधून दिले होते का? काही बोलतात. ते काय धडाचे होते का? हे पण काही धडाचे नाहीत, यांनी पण मराठा आणि ओबीसी समाजासाठी काही नाही केले. आपल्या जनतेला कळत नाही का? आपण दोघांनी मिळून, ओबीसी आणि मराठा सगळ्यांनी मिळून सरकार विरोधात झुंजले पाहिजे. ते आपल्यात वाद लाऊन देतात आणि आपण सुरू.

## डबल ढोलकी सरकारने हातात घंटा देण्याचे काम केले-विजय वडेट्टीवार


काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी मनोज जरांगे यांच्या एकंदरीत आंदोलनावर तसेच सरकारच्या भूमिकेवर सडकून टीका केली आहे. ते म्हणाले, डबल ढोलकी सरकारने पुन्हा आरक्षणाच्या मुद्द्यावर मराठा आणि ओबीसीच्या हातात घंटा देण्याचे काम सुरू केले आहे, असे मला दिसत आहे. काल जरांगे पाटील उपोषणाला बसले आणि त्यामध्ये सरकारकडून विखे पाटलांच्या आणि प्रसाद लाड यांच्या उपस्थितीत निघाला, खरे तर या तोडग्यात 58 लाख ज्या काही नोंदी सापडल्या आहेत, त्यांना कुणबी प्रमाणपत्र द्यायचे म्हणजेच ओबीसीमध्ये समाविष्ट करायचे, हा निर्णय काल झाला.

## विजय वडेट्टीवार यांना मनोज जरांगे पाटील यांनी दिले सडेतोड प्रतिउत्तर

## मराठा-ओबीसीने सरकारच्या विरोधात राहिले पाहिजे : जरांगे

मनोज जरांगे पुढे म्हणाले, काँग्रेसने सुद्धा ओबीसीचे 'वाटोळे केले होते. महायुतीच्या सरकारने सुद्धा तेच केले आहे. मराठा आणि ओबीसीने समजून घेतले पाहिजे की आपण दोघांनी मिळून सरकारच्या विरोधात राहिले पाहिजे. तुम्ही सरकारकडून राहतात आणि आमच्या विरोधात बोंबलतात. दरम्यान, विजय वडेट्टीवार यांनी ओबीसी समाजासाठी रस्त्यावर उतरण्याचा इशारा दिला आहे, त्यावर जरांगे म्हणाले, रस्त्यावर उतरा नाहीतर ओढ्यात उतरा, कुठेही उतरा, असे म्हणत टोला लगावला आहे.

## मनोज जरांगेंनी दिला धनंजय मुंडेंना इशारा



उपोषण सुरू असताना मनोज जरांगे यांनी राधाकृष्ण विखे पाटील यांना म्हटले होते की माझी नार्को टेस्ट करा आणि अजून एकाची करा, यावर प्रश्न विचारला तेव्हा जरांगे म्हणाले, मला वाटले होते बदल झाला पाहजे. ते परळीचंच म्हणाला होता की माझी नार्को टेस्ट करा. मी नव्हतं काही म्हटले. त्यामुळे तो विषय आता मी पुन्हा हातात घेतो. त्याने कोणाला घातपात करायला लावला होता माझा? त्याला कोण पीए भेटायला जात होता परळीमध्ये, त्यात आरोपी कोण करायला पाहिजे होता,

त्या आरोपींना कोण साथ देत आहे, हे सगळे आता मी लावून धरणार आहे, असे म्हणत धनंजय मुंडे यांच्यावर जरांगे यांनी इशारा दिला आहे.

**शिवसेना जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले यांचे नेटके नियोजन कौतुकास्पद**

## शिवसंवाद दौऱ्यातून संघटन बळकटीचा निर्धार!

**गेवराई-आष्टीत पदाधिकाऱ्यांना श्रीकांत शिंदेंच्या महत्त्वपूर्ण सूचना**




➤ गेवराई : प्रतिनिधी

मराठवाड्यात सुरू असलेल्या शिवसेनेच्या 'शिवसंवाद दौऱ्या'च्या दुसऱ्या टप्प्यात गेवराई व आष्टी विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी, युवासेना, महिला आघाडी तसेच शिवसैनिकांच्या आढावा बैठका उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक बळकटी, बूथनिहाय नियोजन, गावपातळीवरील पक्षविस्तार आणि जनसंपर्क मोहिमेच्या कामांचा यावेळी सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीत मार्गदर्शन करताना खासदार श्रीकांत शिंदे यांनी पदाधिकाऱ्यांना जनतेशी सातत्याने संपर्क ठेवण्याचे आवाहन केले. सत्तेचा उपयोग सर्वसामान्य नागरिक आणि शिवसैनिकांच्या प्रश्नांच्या निराकरणासाठी व्हावा, असे सांगत त्यांनी प्रत्येक पदाधिकाऱ्याने आपल्या मतदारसंघातील अडीअडचणींचा नियमित आढावा घेऊन पक्ष नेतृत्वाच्या संपर्कात राहावे, असे निर्देश दिले.

"राजकारण हे केवळ सत्ता मिळवण्यासाठी नसून जनतेची सेवा करण्याचे माध्यम आहे. लोकांची कामे झाली तर शिवसेनेबद्दलचा विश्वास अधिक दृढ होईल आणि आगामी निवडणुकांमध्ये जनतेचा पाठिंबा अधिक वाढेल," असे श्रीकांत शिंदे म्हणाले.

यावेळी त्यांनी निष्क्रिय पदाधिकाऱ्यांनाही स्पष्ट शब्दांत इशारा दिला. "केवळ पद घेऊन मिरवणूक करणाऱ्यांनी आत्मपरीक्षण करावे. शिवसेना वाढीसाठी प्रामाणिकपणे काम करणाऱ्या प्रत्येक पदाधिकाऱ्याच्या पाठीशी मी ठामपणे उभा राहीन," असे ते म्हणाले. तसेच जिल्हाप्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली संघटना तळागाळापर्यंत मजबूत करण्याचे आवाहन त्यांनी केले.

मतदार यादी विशेष पुनरिक्षण मोहिमेच्या (SIR) अनुषंगाने प्रत्येक बूथवर संघटना ● पान ३ वर...

## तुलसी कॉलेजतर्फे मुंबई पोलिस पदी निवड झालेल्या रितेश राऊत यांचा सत्कार

**इच्छाशक्ती असणाऱ्यांना योग्य मार्गदर्शन मिळाले तर ते आपले ध्येय गाठतातच — प्रा. प्रदीप रोडे**

➤ **मुंबई** : देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज कॉम्प्युटर सायन्स अँड आयटी कॉलेजतर्फे मुंबई पोलिस पदी निवड झालेल्या वडवणी तालुक्यातील कवडगाव' चे रितेश राऊत यांचा सत्कार तुलसी कॉलेज, बीड मध्ये करण्यात आला. यावेळी कॉलेजचे संस्थापक तथा अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे यांनी प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

"आयुष्यात एखाद्या होतकरू आणि प्रबळ इच्छाशक्ती असणाऱ्या युवकाला छोटीशी मदत केली तरी तो आनंदाचा क्षण असतो. योग्य मार्गदर्शन मिळाले तर युवक आपले ध्येय निश्चितच गाठतात," असे मत प्रा. प्रदीप रोडे यांनी व्यक्त केले.

यावेळी सत्कारमूर्ती रितेश राऊत यांनी आपल्या यशामागील संघर्ष आणि प्रा. रोडे यांचे योगदान सांगितले. "मी पोलिस भरतीची तयारी करत होतो. मैदानी सरावासाठी जागेची गरज होती. ओव्हाळ सरांनी मला प्रा. रोडे सरांना



भेटण्याचा सल्ला दिला. रोडे सरांनी कोणतीही ओळख नसतानाही तात्काळ कॉलेजचे मैदान सरावासाठी उपलब्ध करून दिले. तसेच इतर पोलिस भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनाही मदत व मार्गदर्शन करण्याची तयारी दर्शविली," असे राऊत यांनी सांगितले.

"प्रा. रोडे सरांचे मार्गदर्शन आणि पाठबळ यामुळेच मला मुंबई पोलिस भरती परीक्षेत यश मिळाले. गावातून आलेल्या विद्यार्थ्यांना मदतीचा हात देणारे हे प्रत्येकाच्या नशिबात नसते. सरांनी केलेली मदत आणि दिलेले मार्गदर्शन मी आयुष्यभर विसरणार नाही," अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. यावेळी प्रा. रोडे सरांनी भविष्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी सुरू करून होतकरू विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचा मानसही व्यक्त केला. या कार्यक्रमास प्रा. राठोड सर, प्रा राम गायकवाड, डॉ विकास वाघमारे, प्रा. एम. डी ओव्हाळ, प्रा पल्लवी जगताप, प्रा साबळे मॅडम, प्रा पाठक मॅडम सह विद्यार्थी उपस्थित होत.

## आजचे राशि भविष्य

### मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

### वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

### कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

### तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

### वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

### धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वतःच्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

### मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# प्रजाजनासाठी धडपडणाऱ्या अहिल्यादेवी : लोककल्याणकारी राज्यकारभाराचा आदर्श




## विशेष



प्रवीण बागडे
मो. क्र. ९९२३६२०९१९
नागपूर

भारतीय इतिहासाच्या विशाल पटावर अनेक राजे, महाराजे, सम्राट आणि राज्यकर्ते होऊन गेले. काहींनी युद्धे जिंकून इतिहास घडविला, तर काहींनी आपल्या पराक्रमाने साम्राज्य विस्तारले. परंतु जनतेच्या मनावर राज्य करणारे आणि प्रजेला आपल्या कुटुंबाप्रमाणे जपणारे राज्यकर्ते फार थोडे होऊन गेले. अशा मोजक्या लोककल्याणकारी राज्यकर्त्यांमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे. सत्ता, संपत्ती आणि वैभवाच्या शिखरावर असूनही ज्यांनी जनतेच्या सुख–दुःखाला आपल्या जीवनाचे ध्येय मानले, अशा अहिल्यादेवी आजही लोकस्मृतीत 'मातोश्री' म्हणून जिवंत आहेत. अहिल्यादेवींचे जीवन म्हणजे संघर्ष, त्याग, दूरदृष्टी आणि लोककल्याण यांचे अद्वितीय उदाहरण होय. चौंडी या छोट्याशा गावात जन्मलेल्या या कन्येने पुढे माळवा प्रदेशाच्या राज्यकारभाराची धुरा समर्थपणे सांभाळली. पती खंडेराव होळकर यांचे युद्धात निधन झाल्यानंतर तत्कालीन समाजरचनेनुसार त्यांच्यावर सती जाण्याचा दबाव होता. परंतु सासरे मल्हारराव होळकर यांनी त्यांना सती जाण्यापासून परावृत्त केले. हा निर्णय केवळ एका स्त्रीचे जीवन वाचवणारा नव्हता, तर भारतीय इतिहासाला एक आदर्श शासिका देणारा ठरला.

मल्हारराव होळकर यांच्या मार्गदर्शनाखाली अहिल्यादेवींनी प्रशासन, अर्थकारण, सैनिकी व्यवस्थापन आणि न्यायदान यांचे बारकावे आत्मसात केले. त्यामुळे सासरे आणि पुत्राच्या निधनानंतर राज्यावर संकटाचे ढग दाटून आले असतानाही त्यांनी धैर्याने नेतृत्व स्वीकारले. अनेक सरदार आणि राजकीय प्रतिस्पर्ध्यांचा विरोध झुगारून त्यांनी माळव्याच्या गादीवर बसण्याचा अधिकार मिळवला. त्या काळात स्त्रीने राज्यकारभार करणे हेच अनेकांना मान्य नव्हते; मात्र आपल्या बुद्धिमत्ता, कार्यक्षमता आणि धाडसाच्या बळावर त्यांनी सर्व विरोधकांना शांत केले.

अहिल्यादेवींच्या राज्यकारभारातील सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे त्यांची प्रजावत्सलता. आजच्या लोकशाहीतही अनेकदा सामान्य नागरिकाला सत्तेच्या दारापर्यंत पोहोचणे कठीण जाते. परंतु अहिल्यादेवी दररोज खुला दरबार भरवत असत. कोणताही प्रजाजन थेट त्यांच्यापर्यंत आपली व्यथा मांडू शकत असे. न्याय मिळवण्यासाठी त्याला दलालांची किंवा शिफारशींची गरज नव्हती. न्याय हा त्यांच्या राज्याचा आत्मा होता.

त्यांच्या न्यायप्रियतेच्या अनेक कथा आजही लोकपरंपरेत सांगितल्या जातात. सुभेदार तुकोजीराव होळकर यांच्या मुलाने प्रजेला त्रास दिला म्हणून त्यालाही शिक्षा देण्यात आली. सत्ता, नातेसंबंध किंवा पद यापेक्षा न्याय मोठा आहे, हा संदेश त्यांनी आपल्या कृतीतून दिला. आजच्या काळात सत्ताधाऱ्यांच्या जवळच्या लोकांवर कारवाई करण्यास प्रशासन अनेकदा टाळाटाळ करते. अशा वेळी अहिल्यादेवींची न्यायनिष्ठा अधिकच प्रेरणादायी वाटते. अहिल्यादेवींनी राज्यकारभार केवळ महसूल गोळा करण्यापुरता मर्यादित ठेवला नाही. त्यांनी शेतकरी, व्यापारी, कारागीर आणि सामान्य जनतेच्या विकासाला प्राधान्य दिले. "शेतकरी सुखी तर राज्य सुखी" हा विचार त्यांनी प्रत्यक्षात उतरविला. शेतकऱ्यांवरील अन्यायकारक कर कमी केले. तलाव, विहिरी आणि पाणीपुरवठ्याच्या सुविधा निर्माण केल्या. दुष्काळाशी मुकाबला करण्यासाठी जलसंधारणाची कामे केली. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मजबूत करण्यासाठी गोपालनाला प्रोत्साहन दिले.

त्यांच्या काळात व्यापार आणि उद्योगधंद्यांनाही उत्तेजन मिळाले. महेश्वर हे शहर त्यांनी केवळ राजधानी म्हणून विकसित केले नाही, तर ते वस्त्रोद्योग, संस्कृती आणि विद्वत्तेचे केंद्र बनवले. आज प्रसिद्ध असलेल्या महेश्वरी साड्यांच्या परंपरेला चालना देण्याचे श्रेयही त्यांनाच जाते. रोजगारनिर्मिती आणि स्थानिक अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी त्यांनी केलेले प्रयत्न आधुनिक आर्थिक धोरणांनाही मार्गदर्शक ठरावेत असे आहेत. अहिल्यादेवींची दूरदृष्टी केवळ अर्थकारणापुरती मर्यादित नव्हती. सामाजिक सुधारणांच्या बाबतीतही त्या आपल्या काळाच्या कितीतरी पुढे होत्या. सतीप्रथेच्या विरोधात त्यांनी लोकजागृती केली. धर्मग्रंथांचा आधार घेऊन सतीप्रथेला कोणताही शास्त्रीय आधार नसल्याचे लोकांना पटवून दिले. विधवांच्या हक्कांचे संरक्षण केले. दत्तक घेण्याच्या प्रक्रियेत अडथळे आणणाऱ्या अधिकाऱ्यांना फटकारले. स्त्रियांच्या सन्मानासाठी आणि स्वावलंबनासाठी त्यांनी अनेक निर्णय घेतले.

आज स्त्रीसक्षमीकरणाची चर्चा मोठ्या प्रमाणात होत असली तरी अठराव्या शतकात एका स्त्रीने इतक्या व्यापक सामाजिक सुधारणा करणे ही अभूतपूर्व बाब होती. त्यामुळेच अहिल्यादेवी या केवळ राजमाता नव्हत्या, तर त्या सामाजिक परिवर्तनाच्या अग्रदूत होत्या. ज्ञान, संस्कृती आणि शिक्षण यांच्याबाबतही त्यांची भूमिका अत्यंत सकारात्मक होती. अनेक विद्वान, पंडित, शास्त्री, कीर्तनकार, वैद्य आणि अभ्यासकांना त्यांनी आश्रय दिला. हस्तलिखित ग्रंथांचे जतन आणि निर्मिती यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत केली. शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी शाळा सुरू केल्या. ज्ञान ही समाजाच्या प्रगतीची खरी शक्ती आहे, याची त्यांना पूर्ण जाणीव होती.

धर्माविषयी त्यांची श्रद्धा खोल होती; मात्र ती अंधश्रद्धा नव्हती. त्यांनी भारतातील अनेक तीर्थक्षेत्रांचा विकास केला. काशी, सोमनाथ, द्वारका, रामेश्वर, हरिद्वार, उज्जैन, अयोध्या यांसारख्या ठिकाणी घाट, मंदिरे, धर्मशाळा आणि यात्रेकरूंसाठी सुविधा उभारल्या. परंतु धर्माच्या नावाखाली भेदभाव किंवा दडपशाही त्यांनी कधीच स्वीकारली नाही. त्यांचा धर्म म्हणजे लोकसेवा आणि मानवतेची उपासना होता. अहिल्यादेवींच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक उल्लेखनीय पैलू म्हणजे त्यांची राजकीय दूरदृष्टी. ब्रिटिशांच्या वाढत्या प्रभावाविषयी त्यांनी वेळेआधीच इशारा दिला होता. पेशव्यांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी इंग्रजांशी संबंध ठेवताना सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला. अस्वलाच्या मिठीची उपमा देत त्यांनी इंग्रजांच्या विस्तारवादी धोरणाचे अचूक विश्लेषण केले. पुढील इतिहास पाहता त्यांच्या या निरीक्षणाची प्रगल्भता अधोरेखित होते.

समाजातील वंचित आणि आदिवासी घटकांबद्दलही त्यांची भूमिका संवेदनशील होती. भिल्ल आणि गोंड जमातींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. रोजगार, जमीन आणि सैन्यात स्थान देऊन त्यांना सन्मानाचे जीवन जगण्याची संधी उपलब्ध करून दिली. गुन्हेगारीकडे वळलेल्या लोकांना शिक्षा देतानाच त्यांचे पुनर्वसन करण्याची मानवी दृष्टी त्यांनी दाखवून दिली. आजच्या काळात शासन आणि प्रशासन यांच्यावर अनेकदा लोकांपासून दूर असल्याचा आरोप होतो. विकासाच्या नावाखाली सामान्य माणसाच्या समस्या दुर्लक्षित होतात. अशा वेळी अहिल्यादेवींचे शासन मॉडेल अधिक महत्त्वाचे ठरते. त्यांनी विकास, न्याय, शिक्षण, सामाजिक समता, धार्मिक सहिष्णुता आणि लोककल्याण यांचा सुंदर समन्वय साधला होता. म्हणूनच त्यांचा तीस वर्षांचा राज्यकाल हा माळव्याच्या इतिहासातील सुवर्णकाळ मानला जातो.

अहिल्यादेवींच्या कार्याची दखल केवळ भारतातच नव्हे तर परदेशी इतिहासकारांनीही घेतली. अनेक इंग्रजी लेखकांनी त्यांची तुलना रशियाच्या कॅथरीन द ग्रेट आणि इंग्लंडच्या राणी एलिझाबेथ यांच्याशी केली आहे. परंतु वस्तुतः अहिल्यादेवींचे व्यक्तिमत्त्व या सर्व तुलनांच्या पलीकडचे आहे. कारण त्यांची महानता केवळ राज्यकारभारात नव्हती, तर जनतेच्या हृदयात निर्माण झालेल्या विश्वासात होती. आजही इंदूर विमानतळ, देवी अहिल्या विश्वविद्यालय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांसारख्या संस्थांमधून त्यांच्या कार्याची आठवण जिवंत ठेवली जाते. मात्र त्यांना खरी आदरांजली म्हणजे त्यांच्या विचारांचे अनुकरण होय. जनतेच्या कल्याणाला प्राधान्य देणारे प्रशासन, न्यायाला सर्वोच्च स्थान, स्त्री–सन्मान, शिक्षणाचा प्रसार आणि सर्वसमावेशक विकास यांची अंमलबजावणी करण्यातच त्यांचे स्मरण सार्थ ठरेल.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या केवळ इतिहासातील एक महान शासिका नव्हत्या; त्या लोककल्याणकारी राज्यकारभाराचा जिवंत आदर्श होत्या. सत्तेला सेवेत रूपांतरित करणाऱ्या, न्यायाला धर्म मानणाऱ्या आणि जनतेच्या सुखात स्वतःचे सुख शोधणाऱ्या या मातोश्रींचे जीवन आजच्या राज्यकर्त्यांसाठी दीपस्तंभ आहे. म्हणूनच इतिहासाच्या पानांवर त्यांचे नाव केवळ एका राणीचे नसून, "रयतेच्या सुखासाठी आयुष्य वेचणाऱ्या लोकमातेचे" म्हणून सदैव अजरामर राहील. सत्ता ही जनसेवेसाठी असते, वैभवासाठी नव्हे; हे आपल्या कर्तृत्वातून जगाला दाखवून देणाऱ्या लोकमाता अहिल्यादेवींना कोटी कोटी प्रणाम. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

# बेलेश्वरवस्तीवरील महिलांचा तहसील कार्यालयावर मोर्चा; शेतरस्ता मोकळा करण्याची मागणी





**लिंबागणेश : प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील बालाघाट परिसरातील मुळुकवाडी ग्रामपंचायत हद्दीतील सुमारे २०० लोकसंख्या असलेल्या बेलेश्वरवस्तीवरील महिलांनी लेकराबाळांसह बीड तहसील कार्यालय गाठून शेतरस्ता तातडीने मोकळा करून देण्याची मागणी केली. मुलांचे शिक्षण, वैद्यकीय सेवा, बाजारहाट तसेच शेतीकामांसाठी वापरला जाणारा महत्त्वाचा रस्ता काही व्यक्तींनी अडवल्याने ग्रामस्थांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) आणि शेख युनूस उपस्थित होते. तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर त्यांनी सकारात्मक भूमिका घेत मंडळ अधिकारी उज्ज्वला राऊत व तलाठी गणपत पोतदार यांना तातडीने स्थळ पाहणी करून अहवाल सादर करण्याचे लेखी आदेश दिले.

शेतरस्ता बंद झाल्यामुळे पेरणीपूर्व मशागत, खत–बियाण्यांची वाहतूक तसेच दैनंदिन ये–जा विस्कळीत झाली असून नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे संबंधित रस्ता तातडीने मोकळा करून देण्याची मागणी बालासाहेब ढास, सदाशिव ढास, महादेव ढास, लक्ष्मण ढास, अभिमान ढास, रंजित ढास, बाळू ढास, मल्हारी ढास, जबाबदारी ढास, मंगल ढास, लताबाई ढास, सोयराबाई ढास, पुष्पा ढास, रत्ना ढास, संजना ढास, कालिदास ढास व विमलबाई ढास यांनी केली.

### शेतरस्ते अडवणाऱ्यांवरील कारवाई केवळ घोषणांपुरती? :

यावेळी प्रतिक्रिया देताना सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी शासनाच्या शेतरस्ता संरक्षण धोरणाच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. शेतरस्ते अडवणाऱ्यांवर कठोर कारवाई, दंडात्मक उपाययोजना तसेच शासकीय योजनांपासून वंचित ठेवण्याच्या घोषणा करण्यात आल्या असल्या तरी प्रत्यक्षात त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे त्यांनी सांगितले.

"शेतकरी आणि ग्रामीण नागरिकांच्या जीवनवाहिन्या असलेल्या शेतरस्त्यांवर अतिक्रमण करणाऱ्यांविरोधात प्रशासनाने तातडीने आणि कठोर कारवाई करावी. केवळ घोषणा न करता प्रत्यक्ष कृतीतून नागरिकांना न्याय मिळणे आवश्यक आहे," असे डॉ. गणेश ढवळे यांनी स्पष्ट केले.

### महत्वाचे ठळक मुद्दे

- बेलेश्वरवस्तीतील महिलांनी लेकराबाळांसह बीड तहसील कार्यालय गाठले.
- शेतरस्ता अडवल्याने नागरिकांना दैनंदिन जीवनात अडचणी.
- तहसीलदारांनी तातडीच्या पाहणीचे लेखी आदेश दिले.
- शासनाच्या शेतरस्ता संरक्षण नियमांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप.
- सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी प्रशासनाकडे कठोर कारवाईची मागणी केली.

# झापोरिझिया अणुऊर्जा प्रकल्पावर युक्रेनचा ड्रोन हल्ला; अणुऊर्जा संस्थेने व्यक्त केली चिंता

आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्था (आयएईए) चे महासंचालक राफेल ग्रॉसी यांनी झापोरिझिया अणुऊर्जा प्रकल्प वर झालेल्या ड्रोन हल्ल्याबाबत तीव्र चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी इशारा देत म्हटले की, अणुऊर्जा केंद्रांवर हल्ले करणे म्हणजे आगीशी खेळण्यासारखे अत्यंत धोकादायक कृत्य आहे.

आयएईएने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर दिलेल्या माहितीनुसार, प्रकल्प प्रशासनाने त्यांना ड्रोन हल्ल्याची माहिती दिली आहे. हा ड्रोन प्रकल्पातील एका टर्बाइन इमारतीवर आदळला. या धडकेमुळे इमारतीच्या भिंतीला छिद्र पडले आहे. राफेल ग्रॉसी यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केले की, कोणत्याही अणुऊर्जा केंद्रावर किंवा त्या केंद्रातून कोणत्याही प्रकारचा हल्ला होऊ नये. त्यांनी सर्व संबंधित पक्षांना संयम बाळगण्याचे आवाहन करत अणुसुरक्षा आणि सुरक्षिततेला कोणताही धोका निर्माण होऊ न देण्याचे आवाहन केले. प्रकल्पात तैनात असलेल्या आयएईए च्या पथकाने नुकसानीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी प्रभावित इमारतीपर्यंत जाण्याची परवानगी मागितली आहे. ही माहिती एका वृत्तसंस्थेने दिली आहे.

आयएईएच्या मते, एप्रिल २०२४ नंतर प्रथमच प्रकल्पाच्या संरक्षित परिसरात ड्रोन हल्ला झाला आहे. झापोरिझिया अणुऊर्जा प्रकल्प हा युरोपमधील सर्वात मोठ्या अणुऊर्जा केंद्रांपैकी एक आहे. मार्च २०२२ पासून हा प्रकल्प रशियाच्या ताब्यात आहे. रशिया–युक्रेन युद्ध सुरू झाल्यापासून आयएईए सातत्याने लष्करी कारवायांमुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांबाबत इशारे ● पान ३ वर...



## विशेष

### हिमाचलमध्ये भीषण दुर्घटना!

# छत्तीसगडच्या पर्यटकांची कार ५०० फूट दरीत कोसळली; ८ जणांच्या मृत्यूची भीती

शिमला : हिमाचल प्रदेशातील चंबा जिल्ह्यात एक हृदयद्रावक अपघात घडला असून छत्तीसगडमधील पर्यटकांना घेऊन जाणारी कार खोल दरीत कोसळल्याने आठ जणांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. चुराह उपविभागातील बैरागढ-साच पास-किलाड मार्गावर गुरुवारी (२९ मे) मध्यरात्री ही दुर्घटना घडली. अपघातानंतर वाहनातील सर्वजण बेपत्ता असून दुर्गम भागामुळे बचावकार्य मोठ्या अडचणींमध्ये सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, छत्तीसगडमधील दोन कुटुंबांतील सात सदस्य हिमाचल प्रदेशात पर्यटनासाठी आले होते. ते डलहौजी येथील एका हॉटेलमध्ये वास्तव्यास होते. २९ मे रोजी त्यांनी प्रसिद्ध साच पास परिसरात फिरण्यासाठी प्रस्थान केले होते. संध्याकाळपर्यंत हॉटेलमध्ये परतण्याचे नियोजन असतानाही ते परतले नाहीत. त्यांच्या मोबाईलवर संपर्क होत नसल्याने हॉटेल व्यवस्थापनाने पोलिसांना माहिती दिली आणि त्यानंतर शोधमोहीम सुरू करण्यात आली. शिमला : हिमाचल प्रदेशातील चंबा जिल्ह्यात एक हृदयद्रावक अपघात घडला असून छत्तीसगडमधील पर्यटकांना घेऊन जाणारी कार खोल दरीत कोसळल्याने आठ जणांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. चुराह उपविभागातील बैरागढ-साच पास-किलाड मार्गावर गुरुवारी (२९ मे) मध्यरात्री ही दुर्घटना घडली. अपघातानंतर वाहनातील सर्वजण बेपत्ता असून दुर्गम भागामुळे बचावकार्य मोठ्या अडचणींमध्ये सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, छत्तीसगडमधील दोन कुटुंबांतील सात सदस्य हिमाचल प्रदेशात पर्यटनासाठी आले होते. ते डलहौजी येथील एका हॉटेलमध्ये वास्तव्यास होते. २९ मे रोजी त्यांनी प्रसिद्ध साच पास परिसरात फिरण्यासाठी प्रस्थान केले होते.

संध्याकाळपर्यंत हॉटेलमध्ये परतण्याचे नियोजन असतानाही ते परतले नाहीत. त्यांच्या मोबाईलवर संपर्क होत नसल्याने हॉटेल व्यवस्थापनाने पोलिसांना माहिती दिली आणि त्यानंतर शोधमोहीम सुरू करण्यात आली.

तपासादरम्यान पर्यटकांची एर्टिगा कार (HP 01 C 2133) बैरागढ-साच पास-किलाड मार्गावर खोल दरीत कोसळल्याचे उघड झाले. अपघात इतका भीषण होता की वाहनाचे अक्षरश: तुकडे झाले आहेत.

वाहन अनेकशे फूट खोल दरीत पडल्याने त्यातील प्रवाशांच्या बचावाची शक्यता अत्यंत कमी असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे. दुर्घटनास्थळ अत्यंत दुर्गम आणि डोंगराळ भागात असल्याने पोलीस, आपत्ती व्यवस्थापन पथक आणि स्थानिक बचाव पथकांना घटनास्थळी पोहोचण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे.

# मनुर शिवारात कथित प्राण्यांच्या अवशेषांची पोती आढळल्याने खळबळ

## निष्पक्ष चौकशीची मागणी





➤ अरविंद ओव्हाळ : प्रतिनिधी

माजलगाव शहरालगतच्या मनुर शिवार परिसरात काही पोत्यांमध्ये कथित प्राण्यांचे अवशेष आढळल्याची माहिती समोर आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. स्थानिक नागरिकांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून सत्य परिस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, मनुर शिवारातील एका भागात मोठ्या प्रमाणात पोती टाकण्यात आल्याचे निदर्शनास आले. या पोत्यांमध्ये गोवंशाचे अवशेष असावेत, असा संशय काही नागरिकांनी व्यक्त केला आहे. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिक आणि विविध सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते घटनास्थळी पोहोचले. काहींनी अवैध कत्तलीची शक्यता व्यक्त केली असली तरी संबंधित अवशेष नेमके कोणत्या प्राण्याचे आहेत, ते तेथे कोणी आणून टाकले आणि त्यामागील कारण काय आहे, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत पुष्टी झालेली नाही.

यामुळे सोशल मीडियावर किंवा अन्य माध्यमांतून प्रसारित होत असलेल्या विविध दाव्यांबाबत सावध भूमिका घेण्याची गरज व्यक्त होत आहे. संबंधित अवशेषांचे वैज्ञानिक परीक्षण आणि अधिकृत तपास पूर्ण झाल्यानंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होऊ शकणार असल्याचे जाणकारांचे मत आहे.

दरम्यान, नागरिकांनी पोलीस प्रशासन, पशुसंवर्धन विभाग आणि महसूल यंत्रणेने घटनास्थळाची तातडीने पाहणी करून आवश्यक नमुने तपासणीसाठी पाठवावेत, अशी मागणी केली आहे. तसेच या प्रकरणामागे कोणताही बेकायदेशीर प्रकार आढळल्यास संबंधितांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

काही नागरिकांनी या घटनेमुळे धार्मिक भावना दुखावल्या जाऊ शकतात, अशी चिंता व्यक्त केली आहे. मात्र, तपास पूर्ण होण्यापूर्वी कोणत्याही अफवा किंवा अप्रमाणित माहितीवर विश्वास ठेवू नये, तसेच सामाजिक सलोखा आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सर्वांनी संयम बाळगावा, असे आवाहनही करण्यात येत आहे.

या घटनेबाबत प्रशासनाकडून अद्याप अधिकृत भूमिका जाहीर करण्यात आलेली नसून, संबंधित यंत्रणांच्या तपासानंतर पुढील माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

**महत्वाचे ठळक मुद्दे**

● मनुर शिवारात पोत्यांमध्ये कथित प्राण्यांचे अवशेष आढळल्याची माहिती. ● काही नागरिकांकडून गोवंशाचे अवशेष असल्याचा संशय व्यक्त. ● कोणतीही अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही. ● वैज्ञानिक तपासणी व निष्पक्ष चौकशीची मागणी. ● अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आणि सामाजिक सलोखा राखण्याचे आवाहन.

# प्रा. डॉ. श्याम सांगळे यांचा सेवापूर्ती गौरव; तालुक्यातील पत्रकारांकडून सत्कार




➤ आष्टी / प्रतिनिधी :

तालुक्यातील कडा येथील प्रतिष्ठित आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालयातील ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. श्याम सांगळे यांच्या प्रदीर्घ आणि उल्लेखनीय शैक्षणिक सेवेची कृतज्ञतापूर्वक दखल घेत, त्यांच्या सेवापूर्ती गौरव सोहळ्यानिमित्त तालुक्यातील पत्रकारांच्या वतीने नुकताच त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. एका आदर्श शिक्षकाच्या सन्मानार्थ पत्रकारांनी एकत्र येत दिलेली ही मानवंदना कौतुकाचा विषय ठरली आहे.

शिक्षण क्षेत्रात आपल्या ज्ञानदानाचे पवित्र कार्य करत प्रा. डॉ. सांगळे यांनी गेली अनेक वर्षे विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण काम केले आहे. त्यांच्या याच निस्वार्थ सेवेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यासाठी या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. लेखणीच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या पत्रकारांनी एका ज्ञानदात्याच्या कार्याचे असे जाहीर कौतुक करणे, हे समाजमनावर एक सकारात्मक छाप सोडून गेले आहे. या छोटेखानी परंतु अत्यंत भावपूर्ण सत्कार सोहळ्यासाठी तालुक्यातील पत्रकारितेतील अनेक मान्यवर उपस्थित होते. डॉ. सांगळे यांना शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

या विशेष सत्कार प्रसंगी तालुक्यातील अनेक ज्येष्ठ व तरुण पत्रकार आवर्जून उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, रघुनाथ कर्डिले, राजेश राऊत, विनोद ढवळे, दिगंबर बोडखे, नितीन कांबळे, मिलिंद देशमुख, राजेंद्र तांगडे, संदीप जाधव, समीर शेख, अमोल जगताप, दिपक गरुड यांचा समावेश होता. या सर्वच उपस्थित पत्रकारांनी प्रा. डॉ. श्याम सांगळे यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाला उजाळा दिला आणि त्यांच्या निवृत्तीनंतरच्या पुढील निरोगी, दीर्घायुषी व सुखमय वाटचालीसाठी शुभेच्छा



# सिरसाळा येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती उत्साहात साजरी

➤ सिरसाळा : प्रतिनिधी

सिरसाळा येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचा समाजाने आदर्श घ्यावा, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या लोककल्याणकारी कारभार, सामाजिक न्याय आणि विकासाभिमुख कार्यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमास सरपंच नशीबभाई शेख, चेअरमन संतोषराव पांडे, गोरखदादा काळे, ॲड. सतीशभैया काळे, जावेद पठाण, बल्ली गायकवाड यांच्यासह ग्रामस्थ व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले असून उपस्थितांनी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याला अभिवादन केले

# शिवसंवाद दौऱ्यातून संघटन बळकटीचा निर्धार!

● पान १ वरून . . .

अधिक सक्षम करण्यावर विशेष भर देण्यात आला. नवीन मतदार नोंदणी, मतदार यादी पडताळणी, बोगस नावे वगळणे तसेच बीएलए, शाखाप्रमुख आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांनी अधिक जबाबदारीने बूथस्तरावर काम करावे, अशा सूचनाही बैठकीत देण्यात आल्या. यावेळी बीड जिल्हाप्रमुख ॲड. चंद्रकांत नवले यांनी संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेत पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. "गेवराई मतदारसंघात सध्या केवळ सात पदाधिकाऱ्यांची अधिकृत नियुक्ती झालेली आहे. काही पदाधिकारी केवळ नावापुरते पद धारण करून आहेत; मात्र पक्षाच्या कामात त्यांचा सक्रिय सहभाग दिसून येत नाही," अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

पुढे बोलताना नवले म्हणाले, "हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणारे शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्यासारखे खंबीर नेतृत्व आपल्याला लाभले आहे. सर्वसामान्य शिवसैनिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी ते सदैव तत्पर असतात. 'गाव तिथे शाखा, घर तिथे शिवसैनिक' हा उपक्रम प्रभावीपणे राबवून आगामी काळात गेवराई मतदारसंघात शिवसेनेला क्रमांक एकचा पक्ष बनविण्याचा आपला निर्धार आहे."

यावेळी जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर यांनीही कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. आष्टी मतदारसंघात शिवसेना सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने कार्यरत असून गोरगरीब, दिनदुबळे आणि गरजू नागरिकांच्या मदतीसाठी पक्षाचे पदाधिकारी तत्परतेने धावून जात असल्याचे त्यांनी सांगितले.

पुढे बोलताना गलधर म्हणाले, "शिवसेनेचा प्रत्येक पदाधिकारी हा जनतेच्या प्रश्नांशी बांधिलकी ठेवून काम करत आहे. पक्ष संघटना वाढविण्यासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांची कामे मार्गी लावण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी स्वत:ला झोकून दिले पाहिजे. आष्टी मतदारसंघातील कोणत्याही शिवसैनिकाला किंवा कार्यकर्त्याला बीड जिल्हास्तरावर कोणतेही काम अथवा अडचण भासल्यास मी सदैव त्यांच्या मदतीसाठी उपलब्ध राहीन. संघटना बळकट करण्यासाठी आणि शिवसेनेची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करणे आवश्यक आहे."

बैठकीस मंत्री भरतशेठ गोगावले, खासदार संदीपान भुमरे, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, संपर्कप्रमुख मनोज शिंदे, माजी खासदार आनंद परांजपे, मराठवाडा सचिव अशोकजी पटवर्धन, युवासेनेचे अभिमन्यू खोतकर, रुपेश कदम, बीड जिल्हाप्रमुख ॲड. चंद्रकांत नवले, जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, शिवसेना उपनेत्या संगीता ठोंबरे, शिवसेना नेत्या संगीता ताई चव्हाण, माजी आमदार सुनील धांडे यांच्यासह गेवराई व आष्टी मतदारसंघातील सर्व अंगीकृत संघटनांचे जिल्हाप्रमुख, उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, शहरप्रमुख, जिल्हा संघटक, युवासेनेचे जिल्हा व तालुकास्तरीय पदाधिकारी, महिला आघाडीच्या पदाधिकारी, व्हीजेएनटी आघाडीचे पदाधिकारी, विभागप्रमुख, शाखाप्रमुख, बीएलए-२ तसेच असंख्य शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवसंवाद दौऱ्याच्या माध्यमातून संघटना अधिक मजबूत करण्याबरोबरच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी प्रभावी नियोजन करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# तुला पाचवा जिल्हाप्रमुख व्हायचे का?

## ➤ खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे धनंजय पापा सोळंके यांना सूचक संकेत

➤ माजलगाव : प्रतिनिधी

राज्यव्यापी 'शिवसंवाद दौऱ्या' अंतर्गत बीड व माजलगाव विधानसभा मतदारसंघातील शिवसेना पदाधिकारी, युवासेना, महिला आघाडी आणि शिवसैनिकांची आढावा बैठक खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडली.

बैठकीदरम्यान माजलगाव शहरप्रमुख धनंजय पापा सोळंके यांनी माजलगाव मतदारसंघातील संघटनात्मक प्रश्न, विकासनिधीचे वाटप आणि शिवसैनिकांवरील कथित अन्याय याबाबत परखड भूमिका मांडली. मागील चार वर्षांत माजलगाव मतदारसंघाला डीपीडीसी अंतर्गत अपेक्षित निधी मिळाला नसल्याचा मुद्दा उपस्थित करत त्यांनी जिल्हा नेतृत्वाकडून मतदारसंघाकडे दुर्लक्ष झाल्याची खंत व्यक्त केली.

यावेळी बीड शहरातील एकाच भागातून अनेक जिल्हाप्रमुख नेमण्याऐवजी प्रत्येक विधानसभा मतदारसंघाला संघटनात्मक प्रतिनिधित्व मिळावे, अशी मागणीही त्यांनी केली. त्यांच्या या भूमिकेची दखल घेत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी "तुला पाचवा जिल्हाप्रमुख व्हायचे का?" असे सूचक वक्तव्य केले. या वक्तव्यामुळे उपस्थित शिवसैनिकांमध्ये चर्चेला उधाण आले असून, संघटनात्मक पातळीवर त्याचे विविध अर्थ लावले जात आहेत.

बैठकीत बोलताना धनंजय पापा सोळंके यांनी माजलगाव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकांसाठी जागा उपलब्ध करून देणे व निधी मंजूर करून घेण्यात शिवसेनेची महत्त्वाची भूमिका राहिल्याचे सांगितले.

"शिवसैनिकांच्या हक्काचा निधी, संघटनात्मक सन्मान आणि विकासकामांसाठी आमचा संघर्ष सुरूच राहील. शिवसैनिकांवर अन्याय होऊ दिला जाणार नाही," अशी ठाम भूमिका त्यांनी बैठकीत मांडली.

या बैठकीस मंत्री भरत गोगावले, खासदार संदीपान भुमरे, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, संपर्कप्रमुख मनोज शिंदे, माजी खासदार आनंद परांजपे, युवासेना नेते अभिमन्यू खोतकर, रुपेश कदम यांच्यासह जिल्ह्यातील पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**महत्वाचे ठळक मुद्दे**

● शिवसंवाद दौऱ्याअंतर्गत बीड व माजलगाव विधानसभा आढावा बैठक पार पडली. ● धनंजय पापा सोळंके यांनी विकासनिधी व संघटनात्मक प्रतिनिधित्वाचा मुद्दा उपस्थित केला. ● प्रत्येक मतदारसंघाला जिल्हा पातळीवर प्रतिनिधित्व देण्याची मागणी. ● "तुला पाचवा जिल्हाप्रमुख व्हायचे का?" असे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे सूचक वक्तव्य. ● बैठकीला शिवसेनेचे वरिष्ठ नेते, पदाधिकारी व शिवसैनिकांची मोठी उपस्थिती.

# झापोरिझिया अणुऊर्जा प्रकल्पावर युक्रेनचा ड्रोन हल्ला; अणुऊर्जा संस्थेने व्यक्त केली चिंता

● पान २ वरून . .देत आहे. संस्थेने वारंवार अणुऊर्जा पायाभूत सुविधांच्या सुरक्षेची मागणी केली आहे.

रशियाची सरकारी अणुऊर्जा कंपनी रोसाटॉम यांनी शनिवारी सांगितले की, एका युक्रेनियन ड्रोनने या अणुऊर्जा प्रकल्पावर हल्ला केला.

मात्र, मुख्य उपकरणांना कोणतेही नुकसान झाले नसल्याचेही कंपनीने स्पष्ट केले. हा ड्रोन प्रकल्पाच्या युनिट ६ च्या टर्बाइन आयलंडवर आदळला आणि तेथे स्फोट झाला. या हल्ल्याची माहिती आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेला देण्यात आली आहे.

प्रकल्पाच्या सोशल मीडिया खात्यावरून जारी करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अणुऊर्जा केंद्रांवरील असे हल्ले अत्यंत बेजबाबदारपणाचे आहेत. अशा कारवायांमुळे अणुसुरक्षेला गंभीर धोका निर्माण होतो. पायाभूत सुविधांवरील कोणत्याही हल्ल्याचे परिणाम अत्यंत धोकादायक ठरू शकतात आणि संपूर्ण प्रदेशाच्या सुरक्षेला धोका पोहोचवू शकतात.

या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही आणि मोठे नुकसानही झालेले नाही.

रोसाटॉमचे मुख्य कार्यकारी अधिकारी अलेक्सी लिखाचेव यांनी सांगितले की, अणुऊर्जा प्रकल्पाच्या मुख्य उपकरणांवर झालेला हा पहिलाच थेट हल्ला आहे. या हल्ल्यामुळे स्फोट झाला असून टर्बाइन आयलंडच्या संरचनेचे नुकसान झाले आहे.

# राष्ट्रवादी युवक काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या अहिल्यानगर शहर / अहमदनगर जिल्हा प्रभारी म्हणून रिजवान शेख यांची निवड

➤ आष्टी : येथील युवा नेते रिजवान शेख यांची अहिल्यानगर शहर प्रभारी म्हणून निवड करण्यात आली आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. शरदचंद्रजी पवार साहेब, प्रदेशाध्यक्ष मा. आमदार शशिकांत शिंदे साहेब, युवक प्रदेशाध्यक्ष मा. मेहबूब भाई शेख तसेच पक्षाच्या सर्व वरिष्ठ नेतृत्वाचे मन:पूर्वक आभार रिजवान शेख यांनी व्यक्त केले



आहेत. एका सामान्य कार्यकर्त्यावर पक्षाने दाखवलेला हा विश्वास माझ्यासाठी केवळ पद नसून मोठी जबाबदारी असल्याचे सांगताना पक्षाच्या विचारधारेसाठी, युवकांच्या हक्कांसाठी आणि समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय मिळवून देण्यासाठी अधिक जोमाने काम करणार असल्याचे रिजवान शेख यांनी स्पष्ट केले. माझ्यासोबत नियुक्त झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन व हार्दिक शुभेच्छा देतानाच आपल्या सर्वांच्या सहकार्याने आणि मार्गदर्शनाने अहिल्यानगर / अहमदनगर जिल्ह्यात राष्ट्रवादी युवक काँग्रेसची संघटना अधिक सक्षम, मजबूत आणि प्रभावी करण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहण्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

सत्ता ही जनतेच्या सेवेसाठी असते आणि कार्यकर्ता हा पक्षाचा खरा आधारस्तंभ असतो, या विचाराने प्रेरित होऊन युवकांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून लढण्याची आणि पक्षाची भूमिका तळागाळातील प्रत्येक युवकापर्यंत पोहोचवण्याची ग्वाही देतो. आपले प्रेम, आशीर्वाद आणि सहकार्य असेच कायम राहू द्या. सर्व क्षेत्रातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# शिवसंवाद दौऱ्यातील माणुसकीचा स्पर्श!

## दुःखाच्या डोंगराखाली दबलेल्या सय्यद कुटुंबाला डॉ. श्रीकांत शिंदे यांचा आधार

**केज | प्रतिनिधी**

मराठवाड्यातील ४५ ते ४६ अंश सेल्सिअसच्या रखरखत्या उन्हात शिवसेनेचा 'शिवसंवाद दौरा' सुरू आहे. अंगाची लाही-लाही करणाऱ्या उष्णतेची पर्वा न करता खासदार डॉ. श्रीकांत शिंदे राज्यभरातील शिवसैनिक, पदाधिकारी आणि नागरिकांशी थेट संवाद साधत आहेत. शाखाप्रमुखांपासून ते जिल्हास्तरीय पदाधिकाऱ्यांपर्यंत प्रत्येकाचे म्हणणे ऐकून घेणे, त्यांच्या समस्या जाणून घेणे आणि त्यांच्याशी भावनिक नाते जोडणे, हा या दौऱ्यामागील मुख्य उद्देश आहे.

अशाच दौऱ्यादरम्यान गुरुवारी केज येथे आयोजित आढावा बैठकीत एक हृदयद्रावक घटना घडली. रसूल गफूर सय्यद हे आपल्या कुटुंबावर ओढवलेल्या आर्थिक संकटाबाबत निवेदन देण्यासाठी बैठकीच्या ठिकाणी आले होते. काही दिवसांपूर्वीच त्यांच्या मुलाचे निधन झाल्याने कुटुंब आधीच मोठ्या दु:खातून जात होते. त्या वेदनेतून मार्ग शोधण्यासाठी ते आशेने आले होते. मात्र नियतीने वेगळाच घात केला. बैठकीपूर्वीच त्यांना अचानक हृदयविकाराचा तीव्र झटका आला. उपस्थितांनी तातडीने त्यांना रुग्णालयात दाखल केले, परंतु डॉक्टरांच्या सर्व प्रयत्नांनंतरही





उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. या घटनेची माहिती मिळताच शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक आणि युवासेना निरीक्षक बाजीराव चव्हाण यांनी डॉ. श्रीकांत शिंदे यांना परिस्थितीची कल्पना दिली. पुढील कार्यक्रमांचे नियोजन, दौऱ्याची व्यस्तता आणि राजकीय जबाबदाऱ्या बाजूला ठेवत डॉ. शिंदे यांनी थेट सय्यद कुटुंबाच्या घरी जाण्याचा निर्णय घेतला. घरात शोककळा पसरली होती. काही दिवसांतच मुलगा आणि आता कुटुंबप्रमुख अशा दुहेरी आघाताने कुटुंब पूर्णपणे खचले होते. अशा कठीण प्रसंगी डॉ. शिंदे यांनी कुटुंबीयांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले, त्यांना धीर दिला आणि त्यांच्या दु:खात सहभागी झाले. केवळ सांत्वन करून न थांबता त्यांनी सय्यद कुटुंबासाठी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली. यासोबतच कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाची जबाबदारीही शिवसेना उचलेल, अशी आश्वासक ग्वाही दिली. दु:खाच्या काळोखात आशेचा किरण ठरलेल्या या मदतीमुळे कुटुंबीयांच्या डोळ्यांत अश्रू होते, पण त्या अश्रूंमध्ये आधार मिळाल्याची भावना देखील होती.

मराठवाड्याच्या तप्त भूमीवर सुरू असलेल्या शिवसंवाद दौऱ्यातील हा प्रसंग केवळ एका राजकीय नेत्याच्या भेटीचा नव्हता; तो माणुसकी, संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकीचा जिवंत अनुभव होता. कारण नेतृत्वाची खरी ओळख व्यासपीठावरील भाषणांतून नव्हे, तर संकटाच्या क्षणी दु:खी माणसाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्यातून होत असते.

### खा. श्रीकांत शिंदे यांची जिव्हाळ्याची भूमिका

● पक्ष, राजकारण, स्वार्थ आणि उर्वरित दौऱ्यातील बैठका बाजूला सारून खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी सय्यद कुटुंबाच्या घरी जाऊन त्यांची भेट घेतली आणि मदतीचा हात दिला. त्यांच्या या कृतीतून बीड जिल्हावासियांना माणुसकीचे विराट दर्शन घडले. संकटाच्या काळात एका दु:खी कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत त्यांनी संवेदनशील नेतृत्वाचा आदर्श निर्माण केला. डॉ. शिंदे यांच्यात स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे संस्कार स्पष्टपणे दिसून आले. शिवसेनेची माणुसकीची परंपरा त्यांनी कृतीतून जपली आहे. त्यांच्या या मदतीमुळे सय्यद कुटुंबाला मोठा आधार मिळाला. समाजाप्रती असलेली बांधिलकी आणि आपुलकी त्यांनी पुन्हा एकदा सिद्ध केली. अशा नेतृत्वामुळे सामान्य माणसाचा राजकारणावरील विश्वास अधिक दृढ होतो. असे मत शिवसेना-युवसेनेच्या वतीने बीड जिल्हा संपर्काप्रमुख मनोज शिंदे, जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील भैय्या गलधर, युवा सेना निरीक्षक बाजीराव चव्हाण यांनी व्यक्त करत डॉ. श्रीकांत शिंदे यांचे मन:पूर्वक आभार मानले.

विशेष



## पैठण तहसील कार्यालयाच्या पथकाची चोरटी वाळू वाहतूक करणाऱ्या एका वाहनावर कारवाई

➤ **पैठण : सर्जेराव खडसन**

पैठण ते शहागड रोडवरील शासकीय आयटीआय परिसरातील गोदापात्रातुन यारी यंत्राच्या सहाय्याने अवैध वाळूचे उत्खनन करून ती वाहनात वाळू वाहतूक करत असताना तहसीलच्या गौण खनिज उत्खनन विरोधी पथकाने गोदावरी नदीच्या पात्रात जाऊन सदरील वाहन पकडले असता त्या वाहनाचा चालक चावी घेऊन पळून गेल्यामुळे सदर पथकाला तब्बल तीन ते चार तास गोदावरी नदीच्या पात्रात तळ ठोकून बसावे लागले.

या विषयी मिळालेल्या माहितीनुसार पैठण ते शहागड रोडवरील शासकीय आयटीआय मागील बाजूस असलेल्या गोदापात्रातून काही वाळू चोर अवैध वाळूचे उत्खनन करत असल्याची पैठण मंडळ अधिकारी कल्पना शेळके, ग्राम महसूल अधिकारी शितल झिरपे, तसेच लक्ष्मीकांत लक्ष्मीकांत गोजरे व सुधाकर निकम यांना माहिती मिळाली असता त्यांनी सदर ठिकाणी गेले असता त्यांना काही वाळू चोर गोदापात्रातून अवैधरित्या वाळूचा उपसा करून पिवळ्या रंगाच्या एम एच - २८ बी बी ९२४८ क्रमांकाच्या दोन ब्रासच्या वाहनांमध्ये वाळू भरण्याचे काम सुरू होते. घटनास्थळी पथक धडकताच त्या पथकाला पाहून वाळू उपसा करणारे वाळू चोर आणि त्या वाहनाच्या चालकाने सदर वाहन तिथेच सोडून वाहनाची चावी घेऊन पळून गेला. त्यानंतर सदर पथक कारवाई करत असताना अचानक या ठिकाणी मोठ्या संख्येने वाळू तस्करांनी जमाव करून या पथकावर वाहनावर कारवाई करू नका म्हणत वाहन सोडण्यास दबाव टाकत होते. घटनास्थळी गुंड प्रवृत्तीच्या वाळू चोरांचा मोठा जमाव जमत असल्याचे पाहून या पथकाने पोलिसांना पाचारण केले. या ठिकाणी अशी ही चर्चा होत आहे की, सदर वाहन हे एका सत्ताधारी राजकीय पक्षाच्या एका नगर सेविकेच्या पतीचे असल्याने त्याने आपले राजकीय वजन वापरून सदरील वाहनावर कारवाई करु नये व वाहन सोडण्यात यावे याकरिता काही स्थानिक राजकीय पुढाऱ्यांकडून या पथकावर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. परंतु या पथकाने कोणाच्याही दबावाला न जुमानता कारवाई केल्याची माहिती कळते.



## लिंबागणेश येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती उत्साहात साजरी

➤ **बीड / प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजे लिंबागणेश येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकात आज दि. ३१ रविवार रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांची ३०१ वी जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.


यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. गणेश ढवळे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा जीवनपट उलगडून सांगितला. त्यांनी सांगितले की, 'पुण्यश्लोक' हा शब्द अहिल्यामाईंच्या पुण्यकर्मांचा आणि जनकल्याणकारी कार्याचा गौरव करणारा आहे.

पुराणातील अर्थानुसार पुण्यश्लोक म्हणजे पवित्र, चारित्र्यसंपन्न आणि आपल्या पुण्यकर्मांद्वारे जनहित साधणारी व्यक्ती होय. भारतीय इतिहासात आपल्या पराक्रम, शौर्य आणि आदर्श राज्यकारभारामुळे अजरामर स्थान निर्माण करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे अहिल्यादेवी होळकर असल्याचे त्यांनी नमूद केले. काशीपासून रामेश्वरपर्यंत मंदिरे, घाट, धर्मशाळा, अन्नछत्रे, विहिरी आदींची उभारणी व जीर्णोद्धार हे त्यांचे कार्य केवळ धार्मिकतेपुरते मर्यादित नसून त्यामागे दूरदृष्टी, प्रजाहितदक्षता, न्यायप्रियता आणि कुशल प्रशासनाची भूमिका होती. त्या एक मुत्सद्दी राजकारणी, कर्तव्यदक्ष सेनानी आणि जनतेच्या हितासाठी कार्य करणाऱ्या आदर्श शासक होत्या, असे प्रतिपादन त्यांनी केले. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, रविबापू निर्मळ, अनंतकाका मुळे, यश जाधव, रामदास मुळे, शहादेव धलपे, गोवर्धन मुळे, संदीप मुळे, महावीर मुळे, विठ्ठल तागड, शिवम कोकाटे, नवनाथ मुळे, विशाल तागड, सुमुख मुळे, अमोल गिरे, गणेश तागड, श्याम गिरे, प्रविण मुळे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मेट्रोच्या लिफ्टमध्ये अल्पवयीन विद्यार्थिनीचा विनयभंग; सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

**मुंबई :** कांदिवली पश्चिम परिसरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. डहाणूकरवाडी मेट्रो स्थानकातील लिफ्टमध्ये 17 वर्षीय विद्यार्थिनीचा विनयभंग झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे नागरिकांनमध्ये संतापाची लाट उसळी आहे. या प्रकरणामुळे मेट्रो स्थानकांवरील महिला सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी दुपारच्या सुमारास संबंधित विद्यार्थिनी नेल आर्टच्या क्लाससाठी जात होती. डहाणूकरवाडी मेट्रो स्टेशनला पोहोचल्यानंतर ती प्लॅटफॉर्म क्रमांक 1 वर जाण्यासाठी लिफ्टमध्ये चढली. त्यावेळी लिफ्टमध्ये ती एकटी असल्याचा फायदा घेत एका अज्ञात व्यक्तीने तिच्याशी गैरवर्तन केल्याचा आरोप होत आहे. लिफ्टमधून बाहेर पडताच कुटुंबीयांना माहिती दिली.

घटनेनंतर विद्यार्थिनी प्रचंड घाबरलेल्या अवस्थेत लिफ्टमधून बाहेर आली.




सांज दैनिक बीड वास्तव

सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक - अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922